# के. के. वाघ संस्थेमध्ये 'वाचन संकल्प : महाराष्ट्राचा' कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

**आज वाचन करण्यासाठी भरपूर माध्यमे उपलब्ध आहेत. तरी देखील पुस्तकांच्या वाचनातून एक वेगळेच समाधान प्राप्त होत असते. पुस्तकांच्या वाचन म्हणजे कस्तुरी मृग होय, असे प्रतिपादन प्रा. डॉ. विद्या सुर्वे-बोरसे यांनी केले.**

वाचन संकल्प : महाराष्ट्राचा या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमांतर्गत के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेच्या कविवर्य कुसुमाग्रज मध्यवर्ती ग्रंथालयाच्या वतीने मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन व व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य प्रा. डॉ. के. एन. नांदूरकर, अधिष्ठाता तथा ग्रंथालय समन्वयक प्रा. डॉ. एस. वाय. कुटे व सहाय्यक ग्रंथपाल एम. पी. नंदन उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा. डॉ. विद्या सुर्वे-बोरसे यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने समाधान व्यक्त केले.